INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.625

E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

October-November-December 2019

Vol. 6 Issue 4 (B)





Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

This Journal is indexed in :
- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

**Impact Factor – 6.625** **E-ISSN – 2348-7143**

**INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S**

# RESEARCH JOURNEY

**International E-Research Journal**

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

**October-November-December 2019**

**Vol. 6 Issue 4 (B)**

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV'S Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editors :**
**Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)**
**Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)**
**Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)**
**Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)**

*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

**SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS**

For Details Visit To : **www.researchjourney.net**

**© All rights reserved with the authors & publisher** **Price : Rs. 1000/-**

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | लेखक / लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| | **हिंदी विभाग** | | |
| 1 | आदिवासी कविता में स्त्री | डॉ.बी.एस.भुक्तरे | 06 |
| 2 | महाराष्ट्र के गुजरी लोकागीतों का परिचय | सारिकाबेन पाटील | 13 |
| 3 | कबीर के क्रांतिकारी विचार | प्रा.अशोक तावडे | 19 |
| 4 | भारतीय साहित्य की कालजयी कृतीयाँ एक अध्ययन | सूर्यकांत आमलापुरे | 22 |
| 5 | रामविलास शर्मा का आलोचना-कार्य | प्रो. मोहन | 26 |
| 6 | माखनलाल चतुर्वेदी के काव्य पर 'गीता' का प्रभाव | डॉ. भगवान भालेराव | 30 |
| 7 | हिंदी साहित्य और भारतीय समाज | डॉ. जयश्री वाडेकर | 35 |
| 8 | समकालीन दलित कविता में समाज | डॉ. शैलजा | 39 |
| 9 | हिमांशु जोशी के कहानियों में विविध आयाम | डॉ.रविंद्र खरे | 46 |
| 10 | 'आधा गाँव' उपन्यास में चित्रित आँचलिकता | डॉ. हेमलता काटे | 53 |
| 11 | डॉ. कुँवर बैचैन की ग़ज़लो में विविध रूप | सईद सिद्दिकी | 58 |
| 12 | सांप्रदायिक सद्भाव और हिंदी ग़ज़ल | डॉ.सूरज चौगुले | 61 |
| 13 | 'अंधेरे में' कविता में अभिव्यक्त जीवन संघर्ष | डॉ. वंदना पाटील | 65 |
| 14 | शंभुनाथ सिंह के नवगीतों में बिंब-विधान | श्रीमती रेणु जत्ती | 68 |
| 15 | समकालीन कविता में स्त्री संवेदना | डॉ. संजय गडपायले | 76 |
| 16 | युग-बोध के परिप्रेक्ष्य में शीर्षक की व्यंजना (अंधा युग, अंधा कुआँ, अंधी गली के विशेष संदर्भ में) | सचिन कुमावत | 79 |
| 17 | नाटककार डॉ. नरेंद्र कोहली | डॉ. दत्ता कोल्हारे | 83 |
| 18 | वर्तमान समय में पर्यावरण की प्रासंगिकता | डॉ. हगुरमोहिंदर सिं | 88 |
| 19 | नागार्जुन की राजनीतिक काविताएँ | डॉ. भारती सानप | 92 |
| | **मराठी विभाग** | | |
| 20 | आदिवासींची कुलदैवते | डॉ.अंजली मस्करेन्हस | 98 |
| 21 | देव वऱ्हाड | गिरीष गायकवाड | 102 |
| 22 | आदिवासी काव्यातील सांस्कृतिक चित्रण | मनिषा चरडे | 107 |
| 23 | आदिवासी वारली जमातीची ऐतिहासिक पार्श्वभूमी व आजची सद्यस्थिती | डॉ.सुनील घनकुटे | 113 |
| 24 | मराठी लोकसाहित्यातील तमाशा | प्रविण सोलनकर | 119 |
| 25 | खडी गंमत | ज्योती बाते | 122 |
| 26 | अहिराणी लोक कथेतील सामाजिकता | डॉ.राजेंद्र पाटील | 126 |
| 27 | मुरळी : एक अनिष्ट प्रथा | डॉ.गायत्री गाडेकर | 128 |
| 28 | हलबा-हलबी आदिवासी जमातीची उत्पत्ती आणि सामाजिक स्थिती | डॉ.सुरेश खागार आणि सुनिल उईके | 137 |
| 29 | आदिवासी समाजसुधारक जनार्दन (महाराज) वळवी यांचे सातपुड्यातील आदिवासी भिल्ल समाजासाठी केलेले शैक्षणिक कार्य - एक अभ्यास | डॉ.संजय पाटील आणि प्रा. यशवंत गावीत | 142 |
| 30 | संत चोखोबा : भक्ती आणि कवित्व | डॉ.शकुंतला भारंबे | 147 |
| 31 | संत निवृत्तीनाथांची अभंगवाणी | प्रा.प्रवीण घारपुरे | 151 |

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019),
Vol. 6, Issue 4 (B)
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Oct.-Nov.-Dec. 2019

# देव वऱ्हाड

**गिरीष यशवंत गायकवाड**
(संशोधक विद्यार्थी)
मराठी विभाग
महाराजा सयाजीराव विद्यापीठ बडोदा,
बडोदरा, गुजरात- ३९० ००२
इमेल:ggaikwad952@gmail.com
भ्रमणध्वनी. ८३०८३११८५८

मी माझ्या मावशीच्या घरी गेलो असता जो विधी पाहिला, अनुभवला त्याच्यातून प्रस्तुतचा लेख तयार झाला आहे. हा लेख लिहिण्यामागील उद्देश असा की, येथील आदिवासींचे जीवन, त्यांच्या गरजा, त्यांची देवी देवतांवर असलेली श्रद्धा, भगताचे प्रमुख स्थान, भगताला आदिवासींकडून दिला जाणारा मान, भगताचे आदिवासींच्या जीवनातील प्रमुख कार्य, विधीतील बहुतेक वस्तू किंवा धान्य हे पाच या संख्येत समाविष्ट करणे, शेतीविषयक प्रकट केलेली आस्था, परिसरातील वेगवेगळया स्थानांचे महत्त्व, झाडी बुडीला दिले जाणारे महत्त्व इत्यादी अनेक बाबी या विधीच्या आधारे आपल्याला जाणून घेता येतात.

हा विधी दिनांक २५ व २६ नोव्हेंबर २०१८ अशा दोन दिवशी खांबला येथे साजरा करण्यात आला. हा विधी साधारणतः नोव्हेंबर ते जानेवारी दरम्यान साजरा केला जात असतो. खांबला हे गाव सध्याच्या गुजरात राज्यातील, नवसारी जिल्ह्यातील बासदा तालुक्यात येते. बासदा तालुक्याची एक सीमा महाराष्ट्रातील, नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा तालुक्याला जोडली गेली आहे. खांबला हे गाव सुरगाणा तालुक्याच्या सीमेपासून जवळच आहे. महाराष्ट्र आणि गुजरात वेगळे होण्यापूर्वी बासदा तालुक्यातील बराचसा भाग हा डांग प्रदेश म्हणून ओळखला जात होता. खांबल्याचा परिसरही डांगमध्येच मोडला जात होता. येथील आदिवासी लोकं आजही डांगी बोली बोलतात. डांगी बोली बोलत असूनही येथील आदिवासींचं दुर्दैव असं की, आज हा भाग डांगचा प्रदेश म्हणून ओळखला जात नाही. असो,

ज्या विधीचा मी वर उल्लेख केला तो विधी म्हणजे 'देव वऱ्हाड' होय. यालाच काही आदिवासी 'देव लगन (लग्न)' असेही म्हणतात. या विधीच्या नावाप्रमाणेच देवी देवतांचे लग्न या विधीमध्ये लावले जाते. लग्नालाच डांगी बोलीमध्ये 'वऱ्हाड' असे म्हटले जाते. हा विधी वैयक्तिक असला तरी तो गावकऱ्यांच्या व नातेवाईकांच्या सहकार्याने पार पाडला जातो.

ज्यावेळी एखाद्या कुटुंबावर अरिष्ट ओढवते त्यावेळी ते भगताकडे जातात. ह्या अरिष्टाचे स्वरूप त्यांच्या शेतीविषयक असू शकते, त्यांच्या मुलाबाळांविषयक असू शकते, कर्त्या धर्त्यांविषयक असू शकते किंवा गुराढोरांविषयक असू शकते. अशा वेळी हे अरिष्ट दूर करण्याच्या उद्देशाने ते त्या भगताकडे जातात. भगत अशावेळी अनेक उपाय सुचवतो. त्यापैकीच एक उपाय म्हणजे देव वऱ्हाड करण्याचा विधी. हा विधी साधारणतः सुगीच्या काळानंतर केला जातो. शेतातील सर्व शेतीची कापणी करून खळयात आणली जाते, मात्र मळणी केली जात नाही. याचे एक कारण असे की, या विधीदरम्यान कणसरा मावलीला (धान्याची देवता)

प्रसन्न केले जाते. याचा परिणाम म्हणून होणाऱ्या मळणीत कणसरा मावली आपल्याला बरकत देते असा येथील आदिवासींचा समज आहे.

हा विधी भगताच्या तसेच विधी करणाऱ्याच्या सोयीनुसार केला जातो. त्याला कुठल्याही मुहूर्ताची गरज नसते. हा विधी विटाळला जाऊ नये म्हणून मासिक आलेल्या स्त्रीला या विधीपासून दूर ठेवले जाते. विधी करण्याच्या दहा पंधरा दिवस आधीपासूनच तयारी केली जाते. भगताकडून विधीसाठी लागणाऱ्या वस्तूंची यादी तयार करून घेतली जाते. वेळप्रसंगी भगत स्वतः बाजारात येऊन ह्या वस्तूंची खरेदी करून देतो. त्यामध्ये माठ, अगरबत्ती, गोरसळ (मंगळसूत्र), फणी, खारका, नारळ, वाटी, पाच खाजा, घी, नागेल पान, गोडे तेल, लिंबू, केळी, सफरचंद, मोसंबी, सेरडी (ऊस), काकडी, मेथी, कोथिंबीर, मुळा, गाजर, पालक, अद्रक, हिरवी मिरची, कांद्याची पात, लसणाची पात, वांगे, बटाटे इत्यादी वस्तूंचा समावेश होतो. ह्या वस्तू बाजारातून घरी घेऊन आले की, त्या लगेच खाली उतरून ठेवल्या जात नाहीत. त्यासाठी घरधनीण पूजेचे ताट घेऊन येते व आणलेल्या सामानाची आणि आणणाऱ्या माणसाची ताट ओवाळून, कुंकू लावून पूजा करते. त्यानंतर ती मागल्या पावलीच दिवा ओवाळत ओवाळत त्यांना घरात घेऊन जाते.

विधीच्या पहिल्या दिवशी दुपारी तीन-चार वाजेच्या सुमारास ह्या विधीला सुरुवात होऊन दुसऱ्या दिवशी दुपारी तीन-चार वाजेपर्यंत हा विधी चालतो. ह्या विधीची सुरुवात धवळ गाण्यारणी (धवलेरी) हळद फोडण्यापासून करतात. हळकुंडं फोडता फोडता त्या अनेक प्रकारची हळद फोडण्याविषयीची गाणी म्हणतात. ही फोडलेली हळद विधीच्या वेगवेगळ्या प्रसंगी शेवटपर्यंत वापरली जाते. मांडव घालण्याच्या आधी उंबराच्या बेळीला (खांबाला) मान लावला जातो. त्यासाठी या धवळ गाण्यारणी चांदावा घेवून गाणे म्हणत म्हणत जवळपास असलेल्या उंबराच्या झाडाजवळ जाऊन त्याची पूजा करतात. पूजा झाल्यानंतर उंबराची एक फांदी तोडून तिला मांडवाची बेळ म्हणून स्थापन करतात. मांडवातली ही बेळ इतर बेळींपेक्षा अधिक महत्त्वाची मानली जाते. याच बेळीजवळ एक माठ मांडला जातो. त्या माठात पाणी घालून त्यावर एक छोटासा माठ कळस म्हणून ठेवला जातो. त्याच बेळीजवळ एक शिंदीची काट्याळी फांदी रोवली जाते. त्या काट्यांना झेंडूची फुले टोचून शोभा वाढवली जाते. तसेच एक दोन केळीची पानेही लावली जातात. त्यानंतर मांडवाच्या इतर बेळी स्थापून मांडव तयार केला जातो. बहुधा हा मांडव जुनाच असतो, परंतु त्या त्या ठिकाणी नवीन बेळी स्थापून त्याला नवीन आकार दिला जातो. या बेळी सागाच्या असून त्यांची संख्या पाच ते सहा असते. मांडवाच्या मध्यभागी एक सागाची बेळ उभी केली जाते. या बेळीच्या समोरच विधीची पूजा मांडली जाते. मांडवाला आंब्याचे तोरण बांधले जाते. तसेच दाराला, गोठदाराला, उंबराला, माठाला आणि मांडवाच्या प्रत्येक बेळीला आंब्याचे तोरण बांधले जाते. तोरण बांधून झाल्यानंतर मांडव सुतले जाते.

त्यानंतर तेलन किंवा तेलवण पाडले जाते. तेलवण पाडताना सुरुवातीला मांडवाच्या पूर्व दिशेला जाऊन तेलवण पाडले जाते. नंतर टप्प्याटप्प्याने पाच बेळी, नगारा, माठ, देवघर किंवा देव्हारा, गोठ दार, स्वयंपाक घर इत्यादी ठिकाणी तेलवण पाडून शेवटी पुन्हा पहिल्याच जागी म्हणजेच मांडवाच्या पूर्व दिशेला जाऊन तेलवण पाडले जाते. यामध्ये ज्या ज्या ठिकाणी तेलवण पाडले जाते त्या त्या ठिकाणचे किंवा वस्तूचे नाव घेऊन तेलवणाची गाणी म्हटली जातात. तसेच परिसरातील देवी देवतांची नावे घेऊनही तेलवण पाडले जाते.

संध्याकाळी अंधार पडण्याच्या सुमाराला भगत आणि टाळ वादक येतात. परंतु ते थेट घरी येत नाहीत. घराच्या जवळपास कुठेतरी थांबतात. मग त्यांच्यासाठी पूजेचे साहित्य घेऊन जावे लागते. त्यांना पुजून

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019),
Vol. 6, Issue 4 (B)
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Oct.-Nov.-Dec. 2019

झाल्यानंतर थोडी थोडी दारू पाजली जाते. अशावेळी दारू पाजणे हा एक विधीचाच भाग समजला जातो. रात्रीच्या आठ नऊ वाजता भगत पूजा मांडतात. मांडवाच्या मधोमध उभ्या केलेल्या बेळीशेजारी सुरुवातीला शेणाने सारवून स्वच्छ केले जाते. त्यानंतर त्यावर तांदळाच्या छोट्या छोट्या अनेक पुंजा दिल्या जातात. त्या पुंजांवर परत पाच पुंजा दिल्या जातात. ह्या पाच पुंजांतील मधली पुंज इतर चार पुंजांपैकी सर्वात मोठी असते. ह्या पाचही पुंजांवर एक एक सुपारी ठेवली जाते. तसेच त्या त्या सुपारीखाली एक एक रुपया ठेवला जातो. याव्यतिरिक्त पाच प्रकारची फळे, पाच प्रकारच्या भाज्या, पाच प्रकारचे धान्य, झेंडूची फुले, मुरमुरे, पाचदिवे, अगरबत्ती, कापूर, पेटलेली गवरी, लाकडी फणी (कंगवा), एका पानावर थोडी साखर आणि चहापत्ती, डोरलू (मंगळसूत्र), काळी बांगडी, खारीक, आठ नारळ, या नारळांवर थोडे थोडे



१.'

**देव वऱ्हाड' या विधीतील पुजेची मांडणी**

तांदूळ, एक एक रुपया आणि एक एक झेंडूची फुले, एका ताटात बिड्या, तंबाखू, माचीस आणि चुना, एका ग्लासमध्ये दुध, एका ग्लासमध्ये गोमतीर, एका ग्लासमध्ये मध, एका ग्लासमध्ये पाणी, एका ग्लासमध्ये चहा आणि बेळीला बांधून ठेवलेला ऊस असा सगळा गोतावळा या पूजेत पाहायला मिळतो. पूजा मांडून झाल्यानंतर टाळ वादक टाळ वाजवायला सुरुवात करतात. या टाळ वादकांना येथील आदिवासी एकत्रितपणे 'कासोळा' असे म्हणतात. कासोळा म्हणजेच टाळ. (टाळ हे कासेच्या धातूचे असल्याने त्यांना कासोळा म्हणत असावेत.) ते टाळ वाजवता वाजवता गाणेही म्हणतात. त्यांची संख्या सहा ते सात असते. हे टाळ वाजवणे सकाळी दहा ते अकरा वाजेपर्यंत चालते. अर्थात ते मध्य मध्य चहा पाण्यासाठी थांबतात. ते थांबल्याच्या वेळात धवळ गाण्यारणी गाणे गातात. असे रात्रभर चालू असते.

मध्यरात्रीनंतर एकदा मुख्य भगत आपल्या अंगात वारा घेतो. त्यावेळी घरातली माणसे पाच प्रकारचे धान्य घेऊन जातात. हे धान्य मोजून घेतले जाते. ते भगताकडे दिले जाते. भगत आपल्या पद्धतीने ते धान्य घेऊन काही मंत्र पुटपुटतो, वारा खेळवतो, घुमतो, देवांची नावे घेतो आणि ते धान्य परत करतो. परत केलेले

धान्य दिलेल्या धान्यापेक्षा जास्त आहे का ते मोजून पाहायला सांगतो. जास्त धान्य निघाले तर कणसरा मावली आपल्यावर संतुष्ट झाली असे समजावे. शक्यतो जास्तीचेच धान्य निघते असा येथील आदिवासींचा समज आहे. या सर्व प्रक्रियेला येथील आदिवासी 'उल्फा घेणे' असे म्हणतात. हा उल्फा सकाळीही एकदा घेतला जातो. उल्फ्यालाच महाराष्ट्रातील काही भागात 'बरकत' असेही म्हणतात.

सकाळी विधीच्या शेवटी शेवटी धवळ गाण्यारणी घरातील सगळया सदस्यांना, पाहुण्यांना, भगताला, टाळ वादकांना मांडवात उभे करून गाणे गात गात हातापायाला आणि तोंडाला हळद लावतात. हे झाल्यानंतर एक गमतीशीर प्रकार पाहायला मिळतो. घरातील देव, दगडी घरटी (जातं), डांगर किंवा भोपळा, नारळ, वाळूक (काकडी), मुसळ, मुसळाला बांधलेली शिराव (झाडू) इत्यादी साहित्य डोक्यावर घेऊन नाचत नाचत बाहेर येतात. पाहता पाहता हा आठ दहा लोकांचा गोतावळा त्या पुजेभोवती फेर धरून नाचायला लागतो. त्यात घरातील लहान मोठी माणसे, भगत, टाळ वादक, पाहुणे असे सगळेच


२.

**विविध वस्तू नाचवताना**

सामील होतात. नाचून झाल्यानंतर भगत इशारा करतो आणि सगळे जागच्या जागीच थांबून जातात. मग एका एका जवळच्या वस्तू उतरवताना त्या सरळ खाली न उतरवता एकमेकांच्या हातात देत देत एक फेरा पूर्ण करून शेवटच्या माणसाने त्या वस्तू खाली उतरवायच्या असतात.

वरील गमतीशीर प्रकार झाल्यानंतर रात्री मांडलेली पूजा विस्कटली जाते व त्याच जागी नवीन पूजा मांडली जाते. आता या पूजेत थोडासा बदल झालेला आपल्याला पाहायला मिळतो. तो असा की, घरातून काढून नाचवलेल्या वस्तूंची आता त्यात भर पडलेली आपल्याला पाहायला मिळते. देवी देवतांच्या मूर्तींना, टाकांना टोपलीच्या बाहेर काढून शेंदूर लावून त्यांची मनोभावे पूजा केली जाते. टाळ वादकांच्या वाद्यांना पूजले जाते. शेवटी सगळयांना आपल्या ऐपतीप्रमाणे गोड जेवण देऊन 'देव वऱ्हाड' या विधीची सांगता केली जाते. जाता जाता सगळयांच्या हातात पाच दहा रुपये घातले जातात. कोणीही दुःखी मनाने आपल्या घरीहून जाऊ नये हा त्यामागील उद्देश असतो.

या विधीच्या माध्यमातून येथील आदिवासींची एक आगळीवेगळी संस्कृती अनुभवायला मिळते. त्यांच्या जीवनाशी निगडीत असलेल्या या विधीची सांगता करता करताच त्यांच्यावर असलेल्या एका मोठ्या जबाबदारीतून आणि दुःखातून बाहेर पडल्याचे समाधान लाभलेले पाहायला मिळते.

E-ISSN : 2348-7143
Oct.-Nov.-Dec. 2019

**संदर्भ:**

***कुटुंबातील प्रमुख व्यक्ती:**

१. सगनभाई सोन्याभाई पटेल, मु. पो. खांबला ता. वासदा जि. नवसारी

२. वसंताबेन सगनभाई पटेल, मु. पो. खांबला ता. वासदा जि. नवसारी

***प्रमुख भगत:**

१. सतीश शंकर महाकाळ, मु. ताडपाडा पो. नवताड ता. वासदा जि. नवसारी

२. सुकर कासू ठाकरे (मुख्य भगताचा साथीदार), मु. पो. खांबला ता. वासदा जि. नवसारी

***टाळ वादक:**

१. दशरथ जीनू भोये (व त्याचे सहा साथीदार), मु. बर्डीपाडा पो. पांगारणे ता. सुरगाणा जि. नाशिक

***धवळ गाण्यारणी:**

१. नायजी सितर ठाकऱ्या (व तिच्या तीन साथीदार), मु. पो. खांबला ता. वासदा जि. नवसारी

***उपस्थित प्रमुख पाहुणे:**

१. संतुभाई मोतीराम गावित, मु. सुसरदा पो. साकरपातळ ता. वघई जि. डांग

२. सोमीबेन संतुभाई गावित, मु. सुसरदा पो. साकरपातळ ता. वघई जि. डांग

३. यशवंत आर. गायकवाड, मु. पासोडीपाडा पो. बोरगाव ता. सुरगाणा जि. नाशिक

४. सुमन यशवंत गायकवाड, मु. पासोडीपाडा पो. बोरगाव ता. सुरगाणा जि. नाशिक